म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ८८५

॥ श्रीगजानन प्रसन्न ॥

# [illegible] संगीत मेळा, पुणें.

## पद्यावली व संवाद

— १९३८ —



मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
काव्य नं. ४९८०
ता. २०।१।३१
ठाणें.

REFBK-0005774

कि. १ आणा.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ७८२६
ठाणें

# अगदी प्रथम

--–×–—

मी सर्व प्रेक्षकांना अभिवादन करतो. सुभाष संगीत मेळा निर्माण करून गणेशोत्सवांत गणरायाची सेवा करण्याची स्फूर्ती मला ति. भाऊसाहेब वाशी. कर यांचेमुळें झाली. त्यांनी आमच्या मेळाकार्यास सक्रिय सहानुभूती दाखवून वेळोवेळीं योग्य मार्गदर्शन केलें म्हणूनच आम्हीं सर्वजण हें कार्य करूं शकलों. त्याप्रमाणें मुलामुलींच्या पालकांनीं आमचा उद्देश जाणून आपलीं मुलें मेळ्यांत येऊं दिली ही गोष्ट तितकीच प्रमुख आहे. गणेशोत्सवाच्या चालकांनी आम्हाला अपुलकीनें बोलावून आमची सेवा रुजू करून घेतली याबद्दल त्यांचेहि आभार मानणें कर्तव्य आहे. कवि मंडळींनीं पद्यें व सवाद अल्पावधींत दिले म्हणून आम्ही बोबडे बोल बोलू शकलों. गणेशोत्सव संवादांतील सत्यता प्रेमळ प्रेक्षकांनी मनोमन पडताळुन पाहिल्यास मेळ्याचा उद्देश सहज समजून येईल. शेवटीं साधु तुकोबांची अभंग उक्ती उद्धृत करून मी हें 'अगदी प्रथम' पूर्ण करतो.

तुका म्हणे जाण, व्हावें लहानाहुनी लहान

आपला लहान

पुरुषोत्तम

व्यवस्थापक

सुभाष संगीत मेळा

॥ श्री गजानन प्रसन्न ॥



# सुभाष संगीत मेळा

## पद्यावली व संव

REFBK-0005774
REFBK-0005774

### पद १ लें

जन हो कां बसला, निजला ।
भगवा झेंडा भारत-भूचा ।
उंच धराया देव पातला ॥ धृ०॥
समर तांडवा, करण्या सजला ।
शंकर भोला डमरु वाजला ॥ १ ॥

---

### पद २ रें

विनति तुजसि करित आज । मुरलीधर हे रे ॥
नच बघवत हाल सतत । धांव धांव बा रे ॥ धृ०॥
मनासि मधुर ध्यास सदा । लागे तव; ही वसुधा ॥
बघ बघ तव बंदि पदा । धांव धांव बा रे ॥ १ ॥
पाश गळीं अजि पडला । ओढित तो वैरि भला ॥
सोडविण्या तूं सकलां । धांव धांव बा रे ॥ २ ॥

प्रभा वा. परांजपे

## पद ३ रें

तुझाच सकला छंद हा । धांवत येई राजसा ॥ धृ०॥
भगिनी तवही हिंद--देवता । करिते धांवा ऐक मुकुंदा ॥
येई भराभर अधिर चराचर । तुडवि सकल क्षणिं जाचा ॥ १ ॥

प्रभा वा. परांजपे

---

## पद ४ थें

तूं न करि दारु पान पान पान रे ।
तन मन धन किती नाश करितसे ।
जीव जिवांचा घात करितसे ॥ धृ०॥
सकल देश धूलीस मिळतसे ।
बंद बंद करि दारु पान रे ॥ १ ॥

श्री. ह. आ. उंब्राणीकर
M. A, S. T. C.

---

## पद ५ वें

यातना किती जिवांना । कळति पदोपदीं अनुभवतांना ।
होति मुळि मज कल्पना ना ॥ धृ०॥
रोदति आक्रंदति चिंताकुळ । सुतपदिं तारा विरहें व्याकुल ।
जो पाहूं तो दुःखित भासे । भोगिति विपदा भुवनीं नाना ॥ १ ॥

श्री. मा. ना. जोशी

---

## पद ६ वे

ये मोहन शोभन वितरी रे ।
ये मोहन शोभन वितरी रे ॥ धृ ॥
पारतंत्री रुतली माता । तारका देइ हाता । आतां ।
विनति हीच चरणीं अजि नाथा ॥ १ ॥

श्री. ह. आ. उंब्राणीकर, M. A. S. T. C.

---

## पद ७ वें

दीपक बिना मंदिर जैसा है । हरिनाम बिना नर ऐसा है ॥ धृ ॥
जैसी बिना पुरुसकी नारि है । जैसी पुत्रबिना मातारी है ।
जलबिन सरोवर जैसा है । हरिनाम बिना० ॥ १ ॥
जैसी शर्सी बिनरजनी सोइ है । जैसी बिना लोकनी रसाई है ।
घरधनी बिना घर जैसा है । हरिनाम बिना० ॥ २ ॥
मिराबाई कहे हरिसे मिलना । जहां जन्म-मरणकी नहीं कलना ।
बिन गुरुका चेला जैसा है । हरिनाम बिना० ॥ ३ ॥

---

## पद ८ वें

नमूं श्री आये भू जननी । म्हणा श्री मातरम् वन्दे ॥
उभारा भारती झेंडा । म्हणा श्री मातरम् वन्दे । धृ ॥
सुपुत्रा वीर माताजी । जगाते तिलक गांधीजी ।
म्हणोनी धन्य ही जगतीं । म्हणा श्री मातरम् वन्दे ॥ १ ॥
निमाली रात्र दास्याची । उपाये सुदिन भाग्याची ।
उठारे गरजुनीं आतां । पुन्हां श्री मातरम् वन्दे ॥ २ ॥

## अभंग

१

रूप पहातां लोचनीं । सुख झालें वो साजणी ॥ १ ॥
तो हा विठ्ठल बरवा । तो हा माधव बरवा ॥ २ ॥
बहुता सुकृताची जोडी । म्हणुनी विठ्ठलीं आवडी ॥ ३ ॥
सर्व सुखाचे अगर । बाप रखुमा देवीवर ४

२

ानियाचा राजा गुरु महाराज । म्हणति ज्ञानदेव तुम्हां ऐसे ॥१॥
मज पामरासी काय थोरपण । पायींची वहाण पायीं बरी ॥ २ ॥
ब्रम्हादिकां जेथें तुम्हां बोळवण । इतर तुळण काय पुढें ॥ ३ ॥
तुका म्हणे युक्तिची ते खोली । म्हणोनि ठेविली पायीं डोई ॥४॥

३

यातिकुळ माझें गेलें हारपोनि । श्रीरंगावाचूनि आणुं नेणें ॥ १ ॥
किती शिकवाल मज वेळोवेळां । मी तव गोवळा रातलिये ॥ २ ॥
अष्टभोग भोगणें मातें नाहीं चाड । भक्तिप्रेम सूख लेयिले गे माये२
बापरखुमादेवीवर जिवींचा जिव्हाळा । कांहिं केलिया वेगळा नोहे
गे माये ॥ ४ ॥

४

कोठें गुंतलासी योगियाचे ध्यानीं । आनंद कीर्तनीं पंढरीच्या ॥१॥
काय काज कोठें पडलीसे गुंती । कानीं न पडती बोल माझें ॥ २ ॥
काय शेषशयनीं सुखनिद्रा आली । सोय कां सांडिली तुम्ही देवा ३
तुका म्हणे कोठें गुंतलेती देवा । किती पांडुरंग वाट पाहूं ॥ ४ ॥

५

प्रीति चिया बोला नाहीं पेचपाड । भल तैसे गोड करुनी घेई १॥
तैसे विठ्ठलराया तुजमज आहे । आवडीनें गाय नाम तुझें ॥ २ ॥
वेडे वांकडे बालकांचे बोल । करिती नवल मायबाप ॥ ३ ॥
तुका म्हणे तुज येवो माझी दया । जीविंच्या सखया जिवलगा ॥४॥

६

एक गाऊं आम्ही विठोबाचें नाम । आणिकांचें काम नाहीं आतां॥१॥
मोडुनिया वाटा सूक्ष्म दूस्तर । केला राज्यभार चाले ऐसा ॥ २ ॥
लावुनी मृदंग श्रुति टाळघोष । सेवूं ब्रम्हरस आवडीनें ॥ ३ ॥
तुका म्हणे महा पातकी पतित । ऐसियाचें हीत हेळामात्रें ॥ ४ ॥

७

लागोनिया पायां विनवितों तुम्हांला । करें टाळि बोला मुखें नाम १
विठ्ठल विठ्ठल म्हणा वेळोवेंळां । हा सुख सोहळा स्वर्गी नाहीं ॥ २ ॥
कृष्ण विष्णु हरी गोविंद गोपाळ । मार्ग हा प्रांजळ वैकुंठीचा ॥३॥
सकळांसि येथें आहे अधिकार । कलियुगीं उद्धार हरिनामें ॥ ४ ॥
तुका म्हणे नामापाशीं चारी मुक्ति । ऐसे बहुत ग्रंथी बोलियलें ।५।

८

देहुडा चरणु वाचवितो वेणू । गोपिका रमणु स्वामी माझा ॥ १ ॥
देखिला गे माये यमुनेच्या तीरीं । हात खांद्यावरी राधिकेच्या ॥२॥
गुंजावर्ण डोळे माथा बाबर झोटी । मयुर पुच्छवेष्टीं शोभतसे ३
सगुण मेघश्याम लावण्य सुंदर । नामया दातार केशवराज ॥ ४ ॥

माधवराव बापट

९

जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती । चालविसी हातीं धरोनियां १
चालों आतां आम्ही तुझाचि आधार । चालविसी भार सवें माझा २
बोलूं जातां बरळ करिसी तें नीट । गेली लाज धीठ केलों देवा ३
तुका म्हणे आतां खेळतों कौतुकें । झालें तुझें सुख अंतर्बाह्य । ४ ।

१०

अवघाचि संसार सुखाचा करीन । आनंदे भरीन तीन्हीं लोक ॥१॥
जाईन गे माये तया पंढरपुरा । भेटेन माहेरा आपुलिया ॥९॥
सर्व सुकृताचें फळ मी लाहीन । क्षेत्र मी देईन पांडुरंगीं ॥३॥
बाप रखुमादेवीवरू विठ्ठलेसीं भेटी । आपुले सेवेसाठीं करुनी ठेला॥४॥

११

अगा वैकुंठीच्या राया । अगा विठ्ठल सखया ॥१॥
अगा नारायणा । अगा वसूदेव नंदना ॥२॥
अगा पुंडलीक वरदा । अगा विष्णू तूं गोविंदा ॥३॥
अगा रखुमाईच्या कांता । कान्होपात्रा राखि आतां ॥४॥

गौळण

कृष्णा तुझी मुरली ती पाहिली मी आजरे । यमुनेच्या पाण्या- जातां दृष्टी पडली सहज रे । जाते शुद्धपंथे कृष्णा वाट माझी सोडी रे । जाऊं दे रे कमल नयना ॥१॥ घरीं सासुसासऱ्याचा जाच मला भारी । सासु मोठी भांडखोरी । मज न पाहे बरी ॥ पतीलाही राग येतो । जीव माझा जाईना ॥२॥ पतिव्रता नेम माझा ढळेल हा सारा । तुझ्यापायीं संसार माझा झाला पाठमोरा । एका जनार्दनीं म्हणे साऱ्या चुकल्या येरझारा ॥३॥

# गणेशोत्सव

[ स्थळ—वासंतीचें घर ]

( पात्रें:—वासंती, इतर दोनें-तीन मुली जमवून: पदें म्हणत असते. मामा प्रवेश करतो. )

—नमन—

भावे भज श्रीराम सिताकांत प्रणतनाथ ।
सदय शांत तूं कृपाल, सौख्यदायी तारि नाम ॥धृ०॥
जे ध्यात ताप हरत, स्तुती गात सगुण सतत ।
ध्यानिं रमत शांति नाथ, दे सुख हरि पुरवि काम ॥१॥

मामा—वासंती, पुरे करा हीं गाणीं बजावणी. अहोरात्र गाणीं म्हणायला आमचं घर म्हणजे गायनशाळा आहे का, गोमांतकी आहे ?

वासंती—मामा, अहो हें आमच्या मेळ्याच्या संवादांतलं नमन आहे. तें पाठ करून यायला सांगितलं आहे, शाळूकरांनीं.

मामा— हे शालूकर कोण ? आणि त्यांनीं तुला पदं पाठ करायला सांगितली ?

वासंती— ते किनई इथंच शाळूकरांच्या बोळांत राहातात पूर्वी ते दाणेआळींत रहात होते. आतां मेळ्याच्या तालमीसाठीं—

मामा—शालूकरांच्या बोळांत रहायला आले, असंच ना ? त्यांच्या घरांत तुम्ही केव्हां जातां ?

वासंती—शाळा सुटली कीं थेट तिकडं—त्यांचा माणूस शाळेच्या दाराशीं नेमका उभा असतो.

मामा—आणि तुला तो नेमका शाळूकराच्या बोळांत नेतो होय ना ?

**वासंती**– मामा, मी एकटीच नसते कांहीं. किती मुलं आणि मुली जमतात तिथं. गणपति उत्सवांत मुंबईला जायची तयारी चालली आहे त्यांची. मलाही बरोबर नेणार आहेत.

**मामा**–ते नेणार आहेत कीं तूंच जाणार आहेस त्यांच्या बरोबर ?

**आई**–दादा, त्याला काय हरकत आहे ? या निमित्तानं मुंबई तरी पहायला मिळेल. नाहीं तर पदरचा पैसा खर्चून खाण्या जेवण्याची टीप ठेवून आमच्या वासंतीला कोण नेणार आहे ?

**वासंती**–शिवाय आमचे प्रोग्रॅमसुद्धां होणार आहेत तिथं.कांदेवाडी, आंबे-वाडी फणसवाडी, वाळकेश्वर, बाबूलनाथ –

**मामा**–वा भोळेनाथ, तूं पुण्यांत बसून मुंबईची माहिती बरीच मिळविली आहेस कीं !

**आई**–मला सुद्धां मुंबईची माहिती नाहीं, तेव्हां यंदा मीही बरोबर जाणार आहे वासंतीच्या. गेल्यावर्षी त्या यमनाकाकू आपली तीन चार लेकरं घेऊन चांगल्या महिनाभर राहून आल्या.

**वासंती**–मामा, भाडं कांहीं त्यांनीं खर्चलं नाहीं. सगळा खर्च त्या शालिनी मेळ्याच्या माणसांनीं केला. शिवाय त्यांच्या मुलीला चांदीचे बिल्ले मिळाले, पदकं, पुतळ्या, फ्लॉवर पॉट, टॉयलेट बॉक्स–

**मामा**–केवढी आहे ती मुलगी ?

**आई**–चांगली घोडी वाढली आहे. वासरांत लंगडी गाय शहाणी.

**मामा**–वासरापेक्षां गायच बरी, गोग्रास कांहीं वासरांना किंवा बैलांना घालीत नाहींत. तिचं नांव काय ?

**आई**–तिला म्हणतात इंदू शारंगपाणी.

**वासंती**–पण तिचं मूळचं नांव आहे मालती एकबोटे.

**मामा**–तिचं लग्न सुद्धां झालं आहे कीं काय ?

**वासंती**–नाहीं, तिच्या पालकांनीं हें नवं नांव ठेवलंय.

**मामा**–लग्नाआधी आईबापाशिवाय आणखी कुणी वेगळे पालक असतात कीं काय मुलींना ?

आई– ती ज्या मेळ्यांत होती ना त्या मेळ्याचे मालक, मोठे हौशी आहेत. पदरचा पैसा खर्च करतात, अहोरात्र जागरणं करून मुलांमुलींना शिकवतात.

मामा–आणि मुलींना गांवोगांव हिंडवून गडगंज पैसा मिळवितात.

भाई–मामा अगदीं बरोबर सांगितलंत. आतांशा मेळे काढणं हा एक प्रतिष्ठित रिकामटेकड्या माणसांचा कमाईचा धंदाच होऊन बसला आहे. देशबंधु लजपतराय, लोकमान्य हे सारे मयत देशभक्त आज गणेशोत्सवांत मेळ्यांच्या नावानं पुनः प्रकट होतात.

वासंती—–दादा, पण आमच्या मेळ्याचं नांव सुभाष संगीत मेळा असं आहे ! अरे सुभाषबाबू कॉंग्रेसचे अध्यक्ष आहेत ना ?

मामा–तुझ्या मेळ्यांत राजकारणसुद्धां शिकवितात कीं काय ?

भाई–प्रत्येक शाळेंत नाचाचे आणि गाण्यांचे वर्ग उघडल्यावर, मेळेवाले मुलींना राजकारण समाजकारण शिकवणारच.

मामा–मग वासंतीचें नांव दुसऱ्या शाळेंत घालू या.

आई–घरोघरीं त्याच परी. बोलपटांत काम करणाऱ्या मुलामुलींची हुबे-हूब नक्कल करणाऱ्या मुलींना जिथं बक्षिसं वाटलीं जातात तिथं नाच गाण्याचे वर्ग पाहिजेतच.

भाई–शाळांच्या संमेलनांतून मुलींची नाटकंसुद्धां होऊं लागलीं.

शाळूकर–ते साऱ्या पालकांना, परिक्षकांना, शिक्षण मंत्र्यांना खपतंय; पण आम्ही हौसेखातर मेळे काढून गणरायाची सेवा केली तर तेवढं मात्र नेमकं पोटांत ढवळतंय. पैसाफंडाच्या नांवावर पैसाफंड मेळा पचला, चौंडे महाराजांच्या नांवावर गोरक्षण मेळा चालला.

भाई–राष्ट्रीय आणि सार्वजनिक संस्थांना त्या मेळ्यांनी कांहींतरी पैसा दिला पण तुम्ही केवळ स्वतःच्या चैनीसाठीं लोकांच्या मुलींना राबवतां.

शाळूकर– ती काय आमची एकट्याचीच हौस नाहीं, मुलींची आवड, आईबापांची इच्छा, पालकांची मर्जी. अडचणीचे डोंगरच्या डोंगर ओलां-डून जावे लागतात तेव्हां कुठें मेळेवाला म्हणून मान मिळतो.

( पद )

प्रीत का हौस हि आहे। पाहे।
हौस मुलींची आहे,
हौस मुलांची आहे ॥
प्रीत का हौस न मोल हिला हे।
रीत जगाची आहे।
साहे वार जरी जगताचे।
भवनीं सुनाम राहे ॥ १ । ।

मामा– मी म्हणतो हा मेलेला मान आहे. मी माझ्या लहानपणीं सन्मित्र समाज मेळ्यांत होतो पण आम्हांला एखाद्या मोठ्या देशभक्तायेवढा मान. कैक गणपतीपुढं लोकांनीं आम्हांला टोप्या घातल्या आहेत. त्या काळच्या मेळ्यांतला पोरगा पुढं हटकून जहाल देशभक्त व्हायचाच असा आपला शिरस्ताच पडला होता.

भाई–आणि आजकालकाच्या मेळ्यांतला मुलगा हटकून नाटकांत जायचा आणि मुलगी सिनेमांत रुपेरी पडद्यावर चमकायची.

वासंती–आई, कुकूंतली शान्ता आपटे लहानपणीं म्हणे मेळ्यांतच होती.

शालूकर–आणि बालगंधर्वांनींसुद्धां प्रथम मेळाच काढला होता. मेळा म्हणजे मुलामुलींना ज्ञान शिकविणाऱ्या गद्यपद्यात्मक शाळा.

भाई–मेळे म्हणजे भावी नाटक मंडळ्यांचे नमुने, त्यांतली पदें, त्यांतली संवादरूपी नाटकें पाहिली कीं त्या बालनटांच्या नाट्यसंस्थाच वाटतात.

आई–भाई तुला कौतुकाची दृष्टीच नाहीं. लहान मुलामुलींचा हा लुटुपुटीचा खेळ आहे. शाळा सुटल्यावर हुदड्या मारीत त्या महाराष्ट्रीयमंडळाच्या मैदानावर खेळण्यापेक्षां गाण्याची कला जर आपोआप मिळाली तर त्यांत वाईट काय आहे ?

३।०५ ११८२ २१।४०

शालूकर—शिवाय लग्नाच्यावेळीं गाणं येत नसेल तर मुली उजवावयाला अलीकडं पंचाईत पडते, हें तुम्हांला माहीत नाहीं. भाईसाहेब, आईची दूरदृष्टि आणि धोरण तुम्हां तरुणांना नाहीं समजायचं. आणि मेळ्यांत चमकलेल्या मुलीसाठीं स्थळ शोधायला फारसे कष्टही पडत नाहींत.

मामा—बरं, बरं, त्याची नको तुम्हाला काळजी. पण तुमची दृष्टी आणि धोरण माझ्या लक्षांत आलं आहे. वासंती ऐवजीं तुम्ही आमच्या वसंतालाच आपल्या मेळ्यांत घ्या. म्हणजे आपोआप आमचा मुलगा मुलींच्या, आईबापांच्या नजरेखालून जाईल.

भाई—मामा, आजचं युग बायकांचं आहे. तेव्हां मुलापेक्षां मुलीकडंच लोकांचं अधिक लक्ष जातं. आमच्या मण्डळांतल्या मुलींनीं नुकत्याच पुलावरून उड्या टाकल्या तेव्हां त्यांचं भारी कौतुक झालं.

मामा—तसल्या गोष्टी जर वासंती करील तर मी त्याला एकदम संमती देईन. सिनेमासम्राज्ञीपेक्षां मी झांशीवाली राणीलाच किंमत देईन.

शालूकर—मी राणीचा संवाद बसवून वासंतीला झांशी की रानी बनवतो, मग तर झालं ! अहो मामा, आतांच्या अहिंसेच्या युगांत शिवाजी बाजी सारखी मुलं किंवा ताई तेलीण, झांशीकरीण यांच्यासारख्या मुली कशा निर्माण होतील ! जसा देश तसा वेश. मी पूर्वी मुलांचेही मेळे काढले आहेत.

गोपाळराव—आणि अद्यापही मुलांचाच नव्हे तर मोठमोठ्या माणसांचा मेळा मी चालवतो आहे. लोकमान्यांनीं आंखून दिलेल्या धोरणापलीकडे आम्ही अद्याप पाऊल टाकलं नाहीं.

आई—गोपाळराव, अहो असला धांगडधिंगा कां शिकवला होता लोकमान्यांनीं ? मी ऐकला तुमचा मेळा काढ्या काय बडवतां, ड्रम, पडघम काय वाजवतां, काय नाचतां, पळतां—

शालूकर—यांचे मेळे म्हणजे पानपतात पराभव पावून परतलेले वीर.

मामा—पळपुटे कां होईनात, पण ते वीर आहेत. छातीवर नसले तरी पाठीवर तरी वार घेतात.

गोपाळराव—पण वार देण्याघेण्याला यांना छातीच नाहीं मुळीं.

८०८२४

शालूकर--आणि तुमच्या अंगांत तरी ती ताकद आहे कां ? ढाल, तरवार हे शब्दसुद्धां मेळ्याच्या पदांत येऊं देत नाहींत. सरकारचा ससेमिरा चुकवावा म्हणून ही मुलींच्या मेळ्यांची आणि संवादाची टूम निघाली.

मामा--आणि तुम्ही त्याच्याही पुढं मजल मारून मेळ्याची नाटक मंडळी बनवली--

भाई--मुलगी मेळ्यांत गेली कीं, ती गेल्यांत जमा धरायची. ती एकबोट्यांची मालू--

वासंती--नाहीं हं ! ती इंदू शारंगपाणी आहे. तिनं परवां नाटकांत काम केलन्, किती धीट आहे रे ती--

भाई--मी तेंच सांगतो आहे. ती म्हणे आतां स्वतंत्र मेळा काढणार आहे.

आई--बायकांना नाहीं हो जमायचं तें. २-३ वर्षांपूर्वी शालिनीबाईंनी मेळा काढला होता, पण तो टिकला नाहीं.

शालूकर--पण आम्ही अव्याहत ५-७ वर्षं मेळा काढून यश मिळवतो आहों.

गोपाळराव--पुरे, पुरे ! मध्यंतरी कायद्यानं मेळे बंद केले तरी सुद्धां आम्ही, गुपचुप मेळा काढला आणि खासगी जागेंत भारी ज़हाल पदें ऐकविली.

शालूकर--तुमचेच प्रताप आज साऱ्या मेळ्यांना भोवताहेत. अहो, आपचीं पदें म्हणजे तुकोबाचे अभंग, एकनाथाच्या गौळणी आणि देवाचे धावे, पण ते सुद्धां कमिटीनं पास केले पाहिजेत.

आई--होय कां ? देवाची गाणीं म्हणायला बंदी कां आहे, आणि भाई म्हणतोय कीं, आतां कॉंग्रेसचे राज्य झालंय, स्वराज्य मिळालंय---

गोपाळराव--त्या बाबतींत चळवळ करायला पाहिजे. येरवी ही प्रथा मोडायची नाहीं. अहो उद्यां हे मुलं-मुली सुद्धां पास करून आणा म्हणतील.

मामा--हां तिथं आम्ही हार जाणार नाहीं. आमची वासंती म्हणजे लाखांत पोर आहे.

गोपाळराव--मामा, मेळे म्हणजे सौंदर्याचं चालतं बोलतं प्रदर्शन आहे कीं काय ?

भाई--हो तर, गोऱ्यागोमट्या आणि मोठ्या मुली ज्या मेळ्यांत असतात, त्या मेळ्याचा हजेरीचा दर सर्वांत भारी १५ काय २० काय अन् २५ काय---!

मामा--येवढे रुपये मिळतात ?

भाई---अहो एका वेळेला, एका बैठकीला.

आई---मुलींना यांतले कांहीं नाहींच कां ?

गोपाळराव--मुलींच्या वांट्याला श्रम, दगदग, आजार आणि मार.

शालूकर--गोपाळराव, हा अन्याय होतो आहे. बसायला मोटार, प्यायला दूध, संभाळायला गडी, शिवाय बक्षिस--

आई--मग आमच्या वासंतीला गेल्या वर्षीं कां बक्षीस मिळालं नाहीं ?

शालूकर--अहो, सांगली-कोल्हापूरच्या दौऱ्यांत नुकसान आलं ना ?

गोपाळराव--पण तुम्हासारख्या १०-५ लफंग्यांची चंगळ उडाली ना ?

भाई--ते लफंगे नाहींत, ते धंदेवाले आहेत. गणेशोत्सवाच्या आसपास २-३ महिने हा मेळ्यांचा चैनीचा धंदा केला कीं, वर्षभर पुन्हां मोकळे ते मोकळे.

गोपाळराव--मामा, परवां अशाच एका मोकळ्या मेळेवाल्यानं आपल्या मेळ्यांतल्या मुलीशीं लग्न करण्याचा घाट घातलाय्. घरांतल्या भिंतीवर तिचे फोटो लटकावले, पुस्तकावर डकवले, खिशांत ठेवले, गळ्यांत अडकवले.

आई--मेल्यानं बरान उद्योग उरकला कीं !

गोपाळराव--तिला त्यानं नाटक सिनेमालासुद्धां नेलय्.

शालूकर--अहो हें कांहीं १८९० साल नव्हे. १९३८ सालीं अत्र्यांच्या नाटकालासुद्धां बायकांची विशेषतः कॉलेज शाळांतील मुलांची चिकार गर्दी असते.

भाई--मुलीच काम करूं लागल्या आहेत ना ? बायकांचा ओढा बायकांच्याकडं असायचाच.

इंदू—नाहींतरी स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनींच केल्या पाहिजेत. सगळ्या स्वतंत्र देशांत—

मामा—पण आम्ही अजून स्वतंत्र झालों नाहीं बरं कां बाळे !

वासंती—मामा, हिचं नांव बाळी नाहीं. ही इंदू शारंगपाणी. माझं मेळ्यांतलं काम पहायला ती आली आहे.

आई— तूं सुद्धां यंदा मेळ्यांत आहेस वाटतं ?

इंदू— छे, मी आतां मोठी झालें आहे. मुलींच्या मेळ्यांत कोण जातंयू.

मामा— तूं म्हणे नाटकांत सुद्धां काम करूं लागली आहेस ?

इंदू— छे ! ती आपली हौस आहे झालं.

गोपाळराव— आणि त्या हौसेला मोलही आहे. परवां इथल्याच एका क्लबानं २–३ मुलींना एका संबंध रात्रीचे रोख पैसे देऊन ठरवून आणल्या होत्या. नाटक पाहण्यापेक्षां त्या मुलीच पहायला खूप लोक जमले.

शालूकर— अहो धर्ममार्तंड, नीतिनिपुण, सदाचार शार्दुल, हुजूरपागे-समोर सकाळ संध्याकाळ बघ्या लोकांची रोज येवढी गर्दी जमते ती कां ?

इंदू— शिवाय आम्ही मुली म्हणजे कांहीं गोषेवाल्या मुसलमानणी किंवा तोंडभर पदर घेणाऱ्या मारवाडणी नव्हे.

मामा— मारवाड्यांची गोष्टच बोलूं नकोस. त्यांच्या मुली अशा मेळ्यांत जायच्याच नाहींत.

शालुकर—हा उत्सवच मुळी महाराष्ट्राचा आहे. त्याचं स्वरूप संपूर्ण मराठी घाटाचं आहे.

गोपाळराव— पण मुलामुलींचे ऐषारामी मेळे काढायच्या थाटाचं नाहीं. आमचे मेळे समाज जागृतीचं केवढं कार्य करतात, याची तुम्हाला कल्पना नाहीं.

आई— तुमच्या धांगडधिंग्यामुळं आम्हाला मात्र महिनाभर जागरणं घडताहेत. म्हणे जागृति करताहेत.

इंदू— समाज जागा झालाय आतां. लहान लहान मुलं सुद्धां मोठ्यांचं अनुकरण करूं लागलीं.

भाई— हो हो, तुझ्याच मेळ्यांतली लहान मुलं मारे पांढऱ्या मिशा लावून आजोबाच्या ऐटींत बोलत होवी नाहीं कां ग!

गोपाळराव— अहो याहिपुढं मजल गेली आहे. या इंदुनं बूट, पँट, हॅट घालून, तोंडांत चिरूट धरून रंगभूमीवर प्रवेश केला आहे.

इंदू— अहो तें सारं लुटुपुटीचं होतं. कुंकू बोलपटांतली लहान मुलं नाहीं कां करीत!

शालूकर— शिवाय मी म्हणतो तसं केलं, अगदीं खरंखुरं केलं म्हणून काय हरकत आहे!

मामा— मग राजरोस नाटकांत जायला तरी कोणी हरकत केली आहे? कॉलेजांत मुलं मुली एकत्र शिकतात, त्याचे परिणाम काय होताहेत हे तुम्ही पहाताच ना! गोपाळराव, तुम्ही तुमच्या पदांतून यावर खूप कडक टीका करा.

शालूकर— नाहीं तरी यांच्या मेळ्यांतून असल्या टीकात्मक पदां-शिवाय दुसरं काय असतंय, तसली टीका सुद्धां लोक ऐकतात.

भाई—या बाबतींत पुणेकर भारी निगरगट्ट बनले आहेत. टीका ऐकतात आणि लगेच मुलींचा मेळा आला कीं तोही ऐकतात.

शालूकर— नुसता ऐकतात नव्हे तर तारीफ करतात. आतांशा यांच्या काठ्याबडवी मेळ्यांना भाव नाहीं. वर्गणी देणारा प्रत्येक वर्गणीदार व्यवस्था-पकांना बजावून सांगतो कीं, व्याख्यान, पुराणापेक्षां मुलींचे मेळेच बरे.

डाळवाले— मेळेवाले शालूकर आले आहेत काय इथं?

गोपाळराव— या, या, डाळवाले या–या–मामा, हे मोठे कार्यकर्ते आहेत. यांच्या पेठच्या उत्सवाचे हे आधारस्तंभ म्हणून व्यवस्था चोख असते म्हणून यांच्या गणपतीपुढं प्रेक्षकांची गर्दी फार; आमचा कार्यक्रम केव्हां ठरवतां?

डाळवाले— अहो, आतां आळीकरानीं कार्यकारी मंडळ केलं आहे ना, त्यांचा सारा ओढा मुलींच्या मेळ्याकडं.

शालूकर— समाज जागृतीचा पडताळा पटला!

डाळवाले— तुमच्या वांटणीला पानसुपारीची रात्र येईल. आणि तीहि

रात्रीं बाराच्या पुढें. अहो उत्सवाची रीतच बदलली. पुराण नाहीं, कीर्तन नाहीं, व्याख्यान तर नाहींच नाहीं.

मामा— आतां व्याख्यानाला कोण येतोय् ! घरोघर वर्तमानपत्रं येतात ना ! या पुण्यांत एक ज्ञानप्रकाश होता. पण आतां त्याला पांच भाऊबंद उभे राहिले आणि पोरं ओरडतात कशीं सकाळ, त्रिकाळ, प्रभात किंमत एक पैसा.

डाळवाले--व्याख्यानं ऐकून लोकांना वीट आला. आतां नकला, गाणं फार तर एखाद्या हरदासबुवाचं कीर्तन, तेसुद्धां तासभर पण ! मेळ्याचा प्रोग्राम पाहिजे.

शालूकर— त्यांतल्या त्यांत आमच्या मेळ्याचा भरपूर कार्यक्रम पाहिजे.

डाळवाले-- ती सिंधु पिनाकपाणी मुलगी कुणाच्या मेळ्यांत आहे ?

भाई-- यांच्याच मेळ्यांत होती आणि ही पहा ती इथेंच उभी आहे. तिचं नांव आहे इंदू शारंगपाणी.

डाळवाले— हां ! हां ! हीच. किती मोठी झाली एक वर्षांत !

मामा-- उफाड्याच्याच मुली, मेळमास संपला कीं भराभर वाढूं लागतात.

डाळवाले-- यंदा कोणतं नाटक काढलंय् ?

सिंधु-- मी यंदा मेळ्यांत जाणार नाहीं.

डाळवाले-- आणि मग हो कसं व्हायचं आमचं ! शालूकर, यंदा तुमची वर्णी नाहीं लागायची.

आई – हिला आतां १५ वं लागलंय.

शालूकर-- मग नुस्तं बरोबर यायला काय हरकत आहे ? वाटल्यास संवादांत येऊं नये, प्रॉम्टिंग करावं ! शिटी वाजवावी, व्यवस्था पहावी !

आई-- पण मी म्हणते यंदा आमची वासंती आहे ना !

गोपाळ— तुमची वासंती तुम्हाला ठीक वाटते. पण लोकांच्या दृष्टीनं तुम्ही तिच्याकडे पहा म्हणजे—

आई-- आणि मेळेवाल्यांच्या दृष्टीनं पाहिलं तर ?

गोपाळ-- मेळेवाल्यांची दृष्टीच अलीकडे बदलली आहे. सुरेल, सुरेख,

सभाधीट मुली मेळ्यांत प्रथम पसंत होतात. पदांच्या बाबतींतही तीच तऱ्हा.

शालूकर--- आणि यांच्या मेळ्यांत गलेलठ्ठ, उडाणटप्पू ओरडेश्वर दाणगटांची वर्णी पहिल्यानें लागेल.

मामा— कांहींतरी असाच मर्दानी थाट पाहिजे. मेळा रस्त्यानं चालला कीं, जणुं काय संग्राम करायला सैन्यच चाललें आहे असें वाटून लोकांना चैतन्य यायला पाहिजे. अंगरख्याचे बंद तटातट तुटायला पाहिजेत.

डाळवाले— बरोबर, बरोबर ! आमचा भोर मेळा असाच होता, आणि पदंसुद्धां अशीं जोरदार कीं चेवच यायचा.

गोपाळराव— सन्मित्र समाजाचीं पदें म्हणजे जणुं काय जळके गोळे. आतांसारखं त्यावेळीं रुमझुम नव्हतं. नाच नव्हता, टिपऱ्या, गोफ, गुंफण, प्रहसन आणि प्रदर्शन नव्हतं.

मामा--- आतां सारा नाटकी ढंग भरला आहे—

भाई--- आणि तो भाद्रपदांतच नव्हे तर बारामास चालू आहे. वासंतीच्या अभ्यासाच्या वह्यापेक्षां संवादांतल्या नकलांच्याच वह्या जास्त आहेत.

आई--- पण ती कांहीं अभ्यासांत मागं नाहीं हो.

गोपाळ— इंदु सुद्धां लहानपणीं अशीच होती. आज तिच्या बरोबरच्या कैक मुली न्हात्याधुत्या झाल्या तर कित्येक तर कॉलेजांत गेल्या.

मामा--- आणि हिची किर्ती किती वाढली आहे !

डाळवाले--- आमच्या आळींत तर हिला देवी म्हणून बोलतात.

शालूकर— देवी हे बहुमानार्थी संबोधन आहे !

गोपाळ— पण ते सिनेमा नाटकांतल्या मुलीबायकांना लावतात.

भाई--- तसा भास लोकांना दाखवून फसवणूक करण्याचा हेतू असतो मुळीं मुळांत. ही कोण म्हणे विमलदेवी, कमलदेवी, छोती फुलवंती.

डाळवाले--- बरोबर, बरोबर, आळींतल्या पोरांना आपल्या भावंडापेक्षांही असलीं नांव पाठ आहेत.

गोपाळ--- ऐतिहासिक पुरुषापेक्षां सिनेमांतल्या पऱ्यांची वर्णनं हुबेहूब सांगतात. अलीकडलीं मुलं शांता आपटेचा सिनेमांतला कृत्रिम आवाज काढून तिच्या पदांची भ्रष्ट नक्कल सर्वत्र सुरूं आहे.

मामा— आणि पोषाखांत, बोलण्यांत, वागण्यांतसुद्धां सिनेमा शिरला आहे. आमच्या लहानपणीं जर आम्ही एखाद्या नाटकांतल्या पोराशीं बोललों तर मरेमरेतों मार मिळत असे.

आई— मी अजून तो बालगंधर्व पाहिला नाहीं. नाटक बघायला भारी चोरी !

शालूकर— म्हणूनच ही आज प्रतिक्रिया चालूं आहे. गणेशोत्सवांत, गांवोगांव व्याख्यात्यांनीं वीट आणला होता. आज मोठमोठ्या देशभक्तांची जागा इंदू शारंगपाणी, कुसुम कांचनकोटी, विमलदेवी यांच्यासारख्या कुमारिकांनीं पटकावली आहे.

भाई— अग आई, आपली वासंती सुद्धां अशीच कीर्तिमंत होणार. जशी काय शांता आपटे.

आई— त्या शांता आपटेच अजून लग्न झालं नाहीं म्हणे !

डाळवाले— अहो सिनेमांतल्या नट्या सहसा लग्न करीत नाहींत. त्या तशाच राहतात आणि खूप पैसा मिळवितात. आम्ही एकदां गाण्याच्या बैठकीसाठीं तिला विचारलं होतं.

भाई— तिचं गाणं ऐकण्यासाठीं कीं तिला जिवंतपणें वावरतांना पहाण्यासाठीं !

गोपाळ— डाळवाले, तुम्ही खरं सांगा हं मुलींच्या मेळ्यांना जे तुम्ही दहा दहा रुपये देऊन आमंत्रण देतां ते राष्ट्रीय पदं ऐकण्यासाठीं कीं आणखी कांहीं कारणासाठीं ?

डाळवाले— खरं सांगायचे म्हणजे ही आमच्या वर्गणीदारांची हौस. ह्या असल्या मुलींच्या मेळ्यामुळं बायाबापड्यांची खूप करमणूक होते. सतार, तबला, सारंगी, दिलरुबा, फिडल्, पेटी असलीं खूप वाद्यं वाजतात, कानाला गोड लागतात.

भाई— आणि नजरेलाहि बरं दिसतं.

मामा— मुलींच्या कौतुकाचा हेतू आतां मागं पडून कोणती मुलगी पुढं सिनेमा-नाटकासाठीं तयार होईल या दृष्टीनंच कांहीं लोक मेळ्यांतल्या मुलींकडं पाहूं लागले.

गोपाळ—– बरोबर. हिंदु समाजांतल्या मुली म्हणजे गुलामांच्या बाजारांतल्या गुलाम नव्हेत किंवा बैलबाजारांतल्या विक्रीसाठीं आणलेल्या गाई नव्हेत.

भाई—लग्नाआधीं मुली पहायाची पद्धतसुद्धां आतां बदलूं लागली आहे.

शालूकर—–म्हणूनच त्या ऐवजी ही नवी रूढी पडते आहे. मेळ्यामुळं मुलींना धीटपणा येतो. परवां त्या कुसुम कांचनकोटीनं कुठल्याशा एका नाटकांत दंगा करणाऱ्या प्रेक्षकांना रंगभूमीवरनं ताडफाड उत्तरं दिलीं––

मामा––धीटपणा आणण्यासाठीं मेळ्यांची जरूरी नाहीं. गेल्या सत्याग्रहांत मुंबईतल्या बायकांनीं पोलीसाशीं सामना दिला. त्या बायका कांहीं मेळ्यांत गेल्या नव्हत्या लहानपणीं.

गोपाळ—अहो ! प्रसंग आला कीं आमच्या बायका आपल्या भावाच्या खांद्याला खांदा लावून देशभक्तीचीं कामं करतील.

पद

कधीं प्रभुवरा परम सुमंगल । स्वातंत्र्याची पहाट होईल ॥ धृ ॥
कलह कुटाळ्या या किंकाळ्या । यशोगायनीं लोपुनी जातिल ॥१॥
फितूर पोटाळांचे चाळे । जिथल्यातेथें मुकाट जिरतील ॥२॥
आत्मस्तुतीचे ढोल तडकुनी । राष्ट्रैक्याच्या नौबदी झडतील ॥३॥
धर्मास्तव तरुणांचे तांडे । भरईर्षेनें उडचा ठोकतील ॥४॥
माता भगिनी निर्भय होऊनि । मायभूमीची सेवा करतिल ॥५॥
भिडवुनि खांदा खांद्याला जन । भगवा झेंडा घेऊनि फिरतील॥६॥
भारतभूच्या कीर्ति रवानें । दाहि दिशा या भरून जातिल ॥७॥

डाळवाले––वा ! वा ! असलीं पदं ऐकलीं कीं कसं अंगांत वारं शिरतंय. पण आतांशा हे कवित्व ऐकायलाच मिळत नाहीं. हें कुठलं पद ?

शालूकर—तें आहे त्या संग्राम मेळ्यांतलं. अहो त्यांचा खाक्याच वेगळा होता. मारामाऱ्या, निव्वळ मारामाऱ्याकरितां तो मेळा निघाला होता.

गोपाळ--मेळे म्हणजे दुसरं काय समजतां तुम्ही ? राष्ट्राराष्ट्रांच्या धकाधकींत हाणामारी करून आपला नंबर वरच्या दर्जाला जावा असलं शिक्षण देणारी ही एक संस्था आहे. लोकमान्यांनीं गणेशोत्सव याचसाठीं काढला.

भाई--पण आतां काळ बदलला आहे. यंदापेक्षां संवाद, हावभाव, रंगरंगोटी इकडंच हल्लीं लोकांच लक्ष लागलंय आणि मुलांमुलींनाही तेंच आवडतंय.

इंदू—वासंती, मला नाहीं बाई तुझा हा संवाद आवडला ! यांत आहे काय ? साऱ्यांच्या टवाळ्या. नटणं नाहीं, मुरडणं नाहीं, हावभाव करायला जागासुद्धां नाहीं.

आई—इश्श ! मेळे म्हणजे नाटक मंडळ्या का आहेत ?

मामा —अलीकडच्या मेळेवाल्यांना मेळ्यांची कल्पनाच रुचत नाहीं. बलवंत संगीत, सुभाष संगीत, तर कुणी नुस्तेच गोपाळकृष्ण असें म्हणवतात.

गोपाळ--त्यामुळं वाटेल त्या गोष्टी त्यांत दडपायला मिळतात. अहो प्रत्यक्ष नाटकं होऊं लागलीं.

डाळवाले--पूर्वीं अडाणी माणसं ललितं करीत होती. आतां तुम्ही शाहणी बामणं पोरींना संगती घेऊन नव्या धर्तीची ललितच करतात न् दुसरं काय ?

इंदू--इश्श, ललितवाल्यासारख्या आम्ही विद्रूप कां करतो ? संवादापूर्वीं चांगले दोन तास आम्हांला रंगायला लागतात.

भाई-- तुमचं तुम्हीच रंगता कीं दुसरं कोणी रंगवतो तुम्हांला ?

इंदू--कसं रंगून जायचं याची माहिती प्रथम घ्यायलाच हवी. मला पहिल्यांदा रंगवलं तो, तो, त्यांनीं—मी रंगते कशी हे बघायलाच मुळीं कैकजण आले होते. भारी आस्थेवाईक हो !

गोपाळ--होय तर, मेळ्यांतल्या मुलींची विशेषतः तुमच्यासारख्या हिरॉइनची काळजी वहायला कैकजण स्वयंस्फूर्तीनं पुढं येतील.

वासंती--आई, अग आई, मला सुद्धां परवां त्या मिशीवाल्या बोवानं चटकन् उचलून घेतलीन् आणि गालावरनं हात फिरवलेन्.

आई--कोण होता तो ?

डाळवाले--मुलीचं कौतुक साहजिकच व्हायचं. वासंती तुझं गाणं म्हणून दाखवतेस कां ?

वासंती--मी नाहीं जा. इंदू म्हणते कीं हें गाणं वाईट आहे.

इंदू--होच नाहीं तरी, असल्या चाली पॉप्युलर कशा होतील ? उमाशशी, रत्नप्रभा, कर्नाटकी गोहर, यांचीं पदं पाहिजेत.

डाळवाले--मग तुम्ही म्हणून दाखवा.

शालूकर--हं, कर सुरवात. यांना दिसूं देत तुझे गुण.

इंदू—( गाणें म्हणते. )

## पद

झणिं ये सखये, झणिं ये सखये ।
चल मारूं भरारी उंच उंच गे
प्रीतीच्या गगनीं ॥ धृ० ॥
नटुनि चालली का फुलराणी ।
शोभा उपवनीची घेवोनी ।
रूप संपदा इथें पहा मी ।
प्रेमगीत गाऊनी, सखये ॥ १ ॥

आई—हें तर नाटकांतलच दिसतंय्.

गोपाळ—नाहीं, नाहीं, मेळ्यांतलं आहे !

आई—असलीं गाणीं शिकवून वासंतीला तुम्ही नाटकांत कां दवडणार शालूकर ?

शालूकर—छे, छे, ती अद्याप लहान आहे. शिवाय तुमची—परवानगी—

मराठी ग्रंथ संग्रहालय ... शा. क्र. ... शाखा

मामा—आमची साफ परवानगी नाहीं. वाटल्यास मी मेळ्यांत येतो, पदं म्हणतो, फुकट गणपतीपुढं गातो.

गोपाळ—हेंच लोकमान्यांचं तत्त्व होतं. पण या धंदेवाल्यांनीं मेळ्यांचा विचका केला.

आई—असं असेल तर मी नाहीं बाई वासंतीला पाठवीत. शालूकर, तुम्ही आपले जा कसे!

वासंती—हें ग काय आई! मला किती छान काम मिळालंय.

इंदू—कांहीं सुद्धां छान नाहीं.

डाळवाले—मग तुम्ही यंदा मेळ्यांत आहांत ना?

इंदू—नाना म्हणताहेत कीं—

शालूकर—मी नानांची समजूत काढतो. मग तर झालं ना? निदान तुम्ही थिएटरवरल्या प्रोग्रॅमला अवश्य पाहिजेच.

डाळवाले—आणि आमच्या गणपतीपुढं नको कीं काय?

इंदू—रस्तोरस्तीं हिंडायची मला परवानगी नाहीं.

डाळवाले—मग गोपाळराव तुमचा कार्यक्रम ठरला. काय द्यायचं बोला!

गोपाळ—नारळ, गुलाल आणि जेवढी खुशी असेल तेवढे!

डाळवाले—वाहवा, अशी सेवा पाहिजे.

मामा—या धंदेवाल्या मेळ्यांनीं गणेशोत्सवाचं पावित्र्य पार बिघडवून टाकलं आहे.

डाळवाले—मला हें पटलं. आतां गणपतीपुढं सन्मित्र समाजासारख्या स्वस्त व निरपेक्ष मेळ्यांनाच बोलवायचं.

भाई—आणि आमचा सुभाष संगीत असाच निरपेक्ष आहे.

आई—वासंती, तूं आपली भाईच्याच मेळ्यांत जा कशी!

भाई—आमच्याकडं जागरण नाहीं कीं फारसा ताण नाहीं. मग बोला "लोकमान्य टिळक" महाराज कीं जय!

गोपाळराव—मंगलमूर्ती मोरया!

डाळवाले—गणेशोत्सवाचं मूळचं स्वरूपच आम्हांला तुमच्या बोलण्यां-तनं समजलं कीं. ही सुद्धां त्या गणपती बाप्पाचीच कृपा.

गोपाळराव—म्हणूनच आमची प्रभु चरणी प्रार्थना आहे कीं,

पद

पारतंत्र्य पंकांतूनि देश सोडवावा । हिंददेश माझा, जीवप्राण माझा ॥ध्रु०॥

ज्ञानदीप उजळोनी मार्ग दाखवावा । सत्य, प्रेम, ऐक्य हेंचि लोभ लोभवावा ॥१॥

समाप्त

# विद्यार्थी

प्रवेश १ ला

—नमन—

लीला हरि दावि जगाला, रूप नटला,
व्यापुनि उरला, सकल जगाला,
कलिकालाला, दिव्यमंगला शान्तिसुधेला,
आनंदाला उधळीत आला ॥ धृ० ॥
शरणांगत नत तुझिया चरणीं,
धांवुनि येई दीनोद्धरणीं, दैन्य, दुःख,
तम, संकट निरसुनि, दावि सुपथ,
अजि आसही मन्मनीं ॥ १ ॥

( स्थळः—रस्ता, मुकुंद व सोन्या येतात.)

अनंतराव—का सोन्या, आतां लेका तुझी अगदीं एखाद्या राजासारखी चैन आहे कीं नाहीं ? तेव्हां माझ्या म्हणण्याप्रमाणं वागलास म्हणून आज हे दिवस दिसताहेत. नाहीं तर लेका तुझे हाल कुत्र्यानं खाल्ले नसते.

सोन्या—मामा तुम्ही कांहींहि म्हणा मामा. पण मामा—

अनंतराव—अरे, असं मामा मामा काय म्हणतोस ?

सोन्या—मामा कुणाहि वडील माणसाला मामा म्हणायचा प्रघातच आहे आमच्या मंडळींत. त्यामुळं मामा हा शब्द अगदीं तोंडी लावण्यासारखा तोंडांत वसला आहे, आमच्याकडं कुणीहि पाहुणा येवो, सभ्य येवो, संभावीत

येवो, हितचिंतक येवो पुढारी येवो किंवा कमिटीचा झाडूवाला भंगी येवो, त्याला आपलं मामा म्हणायच—

अनंतराव—मग लेका, मला सुद्धां त्या झाडूवाल्याच्याच पंगतीला बसवतोस कीं काय ? अरे मी जर तुला त्यावेळीं शाळा सोडून पळून जायला उत्तेजन दिलं नसतं तर तूं आज त्या येशासारखा गांवातनं भीक मागत फिरला असतात, किंवा एखाद्या आचाऱ्याच्या हाताखालीं वाढप्या म्हणून, हॉटेलांत चहा देणारा बॉय म्हणून, वर्तमानपत्र विकणारा उनाड पोऱ्या म्हणून किंवा सामानाचा बोजा डोक्यावर घेऊन घरोघरीं फेरी करणारा फेरीवाला म्हणून राहिला असतास.

सोन्या—पण मामा, मी नाटक कंपनींत गेल्यावर हा दर्जा यायला मला कष्ट काय कमी पडले म्हणता होय. त्यापेक्षां शाळेंत जातों तर बर, असं सुद्धां कैकवेळां मला वाटलं.

अनंतराव—अरे हुड्डत्, काय करतो त्या शाळेला घेऊन ! पुनः पुनः तेच ते धडे. तेच ते भुगोल; तेच ते इतिहास, त्याच त्या परीक्षा आणि तेच ते मरतमढे मास्तर. बिचाऱ्यांच्या तोंडावर कांहीं तरी कळा असायची, नेहमीं आपले दुर्मुखलेले बुरसलेले आंबट चेहेऱ्याचे.मला वाटतं,मास्तर या प्राण्याचा कांहीं तरी वेगळाच सांचा देवाजवळ असला पाहिजे. अरे तूंच पहा.आपल्या खेडेगांवचा मास्तर, गांवठी शाळेतला मास्तर, शहर गांवच्या म्युनिसिपल शाळेतला तो मराठी मास्तर, इंग्रजी स्कूलमधला तो पोर सवदा मास्तर, कॉलेजांतला प्रोफेसर या सगळ्यांचा स्वभाव, राहणी, पोशाख, मुद्रा अगदीं एकसारखी. असल्या रडतरावांनीं तुम्हां आम्हांला काय शिकवावं आणि सोन्या आम्ही काय शिकावं ?

सोन्या—मामा हें मात्र खरं बोललांत. असल्या मास्तरांनीं एका सुरांत निर्विकार चेहेऱ्यानं सांगितलेली कोणतीच गोष्ट शाळेंत माझ्या मनावर बिंबली नाहीं. पण नाटक कंपनींत गेल्यावर मामा, हा तुमचा सोन्या—अगदीं दगड म्हणून ठरवलेला हा तुमचा लाडका सोन्या—जसा काय इंद्राच्या दरबारांतला बृहस्पतीच बनला.

अनंतराव—अरे नुसता बृहस्पतीच नव्हेस तर सुंदर सुरेख अप्सराच बन-

लास. ( सोन्या मुरका मारतो.) अरे असा लाजू नकोस, लाजू नकोस. हे बघ आज जी येवढी नांवाजणी चालू आहे ती तूं बृहस्पतीचा पार्ट घेतोस म्हणून नव्हे, तर अप्सरा नटून येतोस, जरा नखरा करतोस, हावभाव दाखवतोस व या गळ्यांतून चार गोड सूर काढून गातोस म्हणून. हाच जर तुं शाळेंत असतास, तर दरवर्षी नापास होऊन मास्तरांच्या, मित्रांच्या, घरच्या मंडळीच्या म्हणजे सर्वांच्याच मर्जीतून पार उतरून अगदीं पोतेरं बनला असतास.

सोन्या–मामा तुम्ही माझ्या अंगचा हा उपजत गुण जाणलांत तसा जर सगळ्या मुलांच्या आईबापानीं मुलांची आवड विचारून त्यांना शिक्षण दिलं तर मला वाटतं ही हायस्कूलं अगदीं ओस पडतील, मामा, कुणाला हवी आहे हो ही घोकंपट्टीची दगदग. त्या भूगोलाचा इतिहासाचा पुढं पोटाला मिळवण्यांत कांहीं तरी उपयोग होतोय का ? वार्षिक परिक्षांची कुंपण आणि खंदक पार ओलांडून शिकण्याची हौस कुणी सुद्धां धरणार नाहीं. मध्यम वर्गांतले आईबाप तर शाळेची ही श्रीमंती चैन करायला मुळींच तयार व्हायचे नाहींत.

अनंतराव–सोन्या, काय विद्वान् झाला आहेस रे. लेका, कुठल्या नाटकांतली ही नक्कल पाठ म्हटलीस ! कोणच्या कवीनं तुला हें टोनिंग सांगितलं, हा मुद्राभिनय तुला कुणी शिकवला ? आं.काय शहाणा झाला आहेस! काय शहाणा झाला आहेस ! ( यशवंत प्रवेश करतो.)

यशवंत–महाराज मला एक आणा देतां कां, फीला कमी पडतो आहे.

अनंतराव–कोण यशवंता, वा, तूं लागलास का अशी भीक मागायला? हं. काढ, काढ शाळेतल्या मास्तरांनीं कमिशन घेऊन तुला लिहून दिलेली तुझ्या दारिद्र्याची सर्टिफिकीटं काढ, गांवांतल्या चार शिष्टांच्या खोट्याच सह्या केलेलीं शिफारसपत्रं काढ, घरांत: आई उपाशी, बाप दुखणेकरी, बहिण लग्नाची, भाऊ आंधळा असली कर्मकहाणी सांग. अरे, या धंद्यांत पडल्यावर लाज भीड ठेवतांव उपयोगी नाहीं. पूर्ण प्रामाणिक बनल्याशिवाय पैसा मिळत नसतो.बरं का सोन्याबापू हा माधवरावांचा लांबचा नातेवाईक !माध-

त्याच्या आईबापांनीं याला आश्रय दिला. तिथं गुण उधळले पोरानं. त्यांनीं दिला हांकलून घराबाहेर. आतां हे धंदे आरंभलेत !

यशवंत—आज मी गरजू आहे, तेव्हां तुम्ही बोलाल ते ऐकून घेणं भाग आहे. मला एक आणा देतां का?

अनंतराव—तुझ्यासारख्या उनाड पोरांना शाळेच्या नांवावर पैसे घेऊन हॉटेलांत चहा भजी खायची संवय लागलेली असते हें मला माहित का नाहीं ? छान. बतावणी तर उत्तम केलीस. तूं इतक्यांत या धंद्यांत तरबेज होशील अशी माझी कल्पना नव्हती.

यशवंत—तुम्ही कांहींहि म्हणा, पण मी अगदीं प्रामाणिकपणें वागतो आहे, मला ही भीक मागायची हौस का आहे ? मी अजून सुद्धां वाटेल त्याच्या घरीं राहीन, त्याची सेवा चाकरी करीन, पडेल तें काम करीन, पण विद्या शिकेन, ज्ञान मिळवीन.

सोन्या—मग आमच्या मंडळीत ये. तिथं तुला आम्ही विद्या शिकवूं. पात्र दोन महिन्यांत रंगभूमीवर आलंच पाहिजे असा आमचा शिरस्ता आहे. तेवढ्या अवधींत तुला गाणं नाचणं बोलणं हावभाव करणं मुरकत मुरडत चालणं वगैरे किती तरी विद्या येतील. शिवाय मोठमोठ्या कवींच्या नाटकांतील निवडक उतारे, म्हणी, सीरीअस भाषणं, विनोदी प्रवेश यांचं पाठांतर होईल, अंगांत धीटपणा येईल, आणि तूं मोठा शाहणा म्हणून तुझी ख्याती होईल. ऐक नटांचे फायदे ऐक.

पद

नट झाल्यावरी । मानमरातबांत लोळायच ॥ धृ० ॥
रंग वारनिश लाऊन, चेहरा गोरा करून ।
रंगभूमिवरी मिरवायच ।
कधीं मर्दापरी । कधीं बाईल खरी ।
कधीं चाकर म्हणून पुढं यायच ।

वाकड तिकड नाचुन, थोडा आदा करून ।
डोळे मारून लोक झुलवायच ।
पदक, पदवी बिल्ला, लुगडं शालू शेला ।
उल्लू पठ्यांनीं मग आम्हा द्यायच ।
चहा कॉफी भजी शिरापुरी ताजी ।
चैन चमन करीत भटकायच ।
वाकडी टोपी घालून, धोतर सोगा सोडून ।
गांव गल्ल्या उगीच हिंडायच ।
खरी विद्या नाहीं, कांहीं नाहींच नाहीं ।
खोट्या लकाकीन दिपवायच ॥ ७ ॥

अनंतराव—यशवंत, तुंझा चेहेरा जरा गोंडस आहे, तेव्हां तुला स्त्री-पार्ट्याचच काम मिळेल. मग लेका तुझा रुबाब काय विचारतोस ! अरे, नाटक कंपनीतच नव्हे तर बाहेर सुद्धां स्त्री-पार्टी पोराला भारी भाव. प्रत्यक्ष बायकोला सुद्धां जे विचारीत नाहीत. ते असल्या: गोंडस स्त्री-पार्टी पोरावर भलते फिदा असतात.

यशवंत—मुकुंदराव, मी आज गरीब झालों, अन्नाला महाग झालों, आसऱ्याला मुकलो म्हणून मला हिणवूं नका, शाळेंत जाऊनच विद्या शिकण्याचा माझा निश्चय कायम आहे. विद्येचा छंद मी कधींहि सोडणार नाहीं. मला विद्या पाहिजे ती असला खोटा मानमरातब मिळविण्यासाठीं नको, आयुष्य असल्या पापी चैनींत घालवावं म्हणून नको, तर मी मनानं मोठं व्हावं, ज्ञानानं संपन्न व्हावं, गहनगूढ तत्त्वार्थीं मी समरस व्हावं म्हणून मला विद्या पाहिजे.

अनंतराव—अरे वारे महात्मा, वारे तत्त्ववेत्ता, वारे विद्यार्थि ! येशा, या साऱ्या शाळेतल्या विद्यार्थ्यांच्या खेलखान्यांत तूंच काय तो ज्ञानमार्ग प्रामाणिकपणें चोखाळून मोक्ष मिळवूं पाहणारा दिसतो आहेस.

सोन्या—मामा, अर्थहि न कळणाऱ्या पुस्तकांची घोकंपट्टी करून का

कुठं मोक्ष मिळणार आहे ! मी शाळेची पुस्तकांची परिक्षांची वर्षानुवर्षं चालणारी कंटाळवाणी वाट टाळून या अगदीं नजिकच्या रस्त्यानं जाऊन चटकन् हा सुखाचा मोक्ष मिळविला आहे.

यशवंत—हा मोक्ष तुमचा तुम्हांलाच लखलाभ होवो, विद्येसारखं सुख नाहीं, विद्येसारखी संपत्ति नाहीं, विद्येसारखा सखा नाहीं विद्येसारखी श्रीमंती नाहीं, विद्येसारखा पाठिराखा नाहीं.

पद

मनाला मुदित करणारी । सुविद्या शक्ति अवतारी ॥
प्रभुची ज्योत निर्धारी । वदावी काय मी थोरी ॥धृ ० ॥
ऋषींची ज्ञानमय मूर्ती । कवींची काव्य गुण स्फूर्ती ॥
यतींची चित्कला गौरी ॥ वदावी ॥ १ ॥
अशक्ता ज्ञान बल देई । मृतात्म्या चेतना येइ ।
सुखाचा स्वर्ग देणारी ॥ वदावी ॥ २ ॥
वर्णिली वेद वेदांती । मुनींनी शारदा सूक्ती ।
अशी ही संपदा भारी ॥ वदावी ॥ ३ ॥

माधव—अनंतराव, ही दरिद्री पोरं वाचाळपणांत पक्की पटाईत असतात. अनंतराव तुम्हीच सांगा कोणता गर्भश्रीमंत वक्ता म्हणून गाजला आहे ? जुन्या पिढीचे टिळक दरिद्री, गोखले दरिद्री, आणि नव्या पिढीच तर विचारूच नका. सारं वक्तृत्व जसं कांहीं दरिद्र्याघरीच जन्माला आलं आहे, आपलं दारिद्र्य ही पोरं आपल्या बडाबडा बोलण्यानं झाकून, इतरांवर इंप्रेशन मारतात. पण बच्चंजी, लक्षांत ठेव. मी याहि बाबतींत तुला हार जायचा नाहीं. सुंदरीच्या मुखानं तूं माझ्या चुगल्या बाबांना सांगितल्यास नाहीं का ?

यशवंत—माधव, मी तुमच्या घरीं अन्न खाल्लं आहे, त्या अन्नाशीं मला बेमानी करतां येणार नाहीं, पण परमेश्वर साक्ष सांगतो. तुझ्या सर्व दुर्गुणावर मी वेळोवेळीं पांघरून घातलं आहे.

माधव—काय पण धर्मात्मा, माझ्यावर उपकारच केलेस हे तूं ! त्या पुण्याईचीच फळं भोगतो आहेस वाटव.चार दिवसांत कुठं जेवायला मिळालं का ? माधुकरी मागितलीस कां कुठं चोरून खाल्लस ?

यशवंत—शाळेतला पहिला नंबर अखेरपर्यंत टिकवून परिक्षा पास होई-पर्यंत कधी उपाशीं कधीं माधुकरी काय वाटेल त्या उपायानं पोट जाळ-लंच पाहिजे. विद्येच्या राज्यांत माधुकरी मागणं पाप नाहीं, वार लावणं पाप नाहीं, पै पैशाची भीक मागणं पाप नाहीं, कुणाची कसलीहि हीन सेवा करणं हेहि पाप नाहीं.

सोन्या—वन्स मोअर, वन्स मोअर, यशवंता, हें वाक्य टाळीच आहे. याला टाळया पडल्याच पाहिजेत. तुझं म्हणणं मला तंतोतंत पटलं. अरे,विद्ये-साठीं आईबापांना न कळत घरांतून पळून जाणं हेंहि पाप नाहीं, कार-कुनीचा धंदा शिकविणारी शाळा सोडणं हेहि पाप नाहीं, नाटकांत जाणं हेहि पाप नाहीं किंवा स्त्री-पार्टी होणं हेहि पाप नाहीं, सारांश, विद्या मिळविण्यासाठीं वाटेल तें करणं हेंहि पाप नाहीं.

माधवः—बरोबर, आम्ही हॉटेलांत चहा भजी खातो, सोडा लेमन पितो, विड्या सिगारेट ओढतो, पानपट्या चघळतो यांत तरी काय पाप आहे ? यामुळं विद्या शिकण्याला उलट हुरूप येतो. आज कालचा विद्यार्थी कसा असतो सांगू कां ?

पद

विद्यार्जनार्थ असला । विद्यार्थी वेष ठरला ॥धृ॥
डोईस केस कुरळे । सौंदर्य काय खुलले ।
चष्मा सुरेख दिसला । विद्यार्थी वेष ठरला ॥१॥
दाढी मिशी पळाली । गाली गुलाबी लाली ।
चेहरा सतेज झाला । विद्यार्थी वेष ठरला ॥२॥
अंगांत फ्रेंच फॅशन् । ब्ल्यू कोट शर्ट सिल्कन ।
मलमल चिकनूची त्याला । विद्यार्थी वेष ठरला ॥३॥

सनबीम बेस्ट सायकल। तोंडी प्रधान स्पेशल।
पंप शू तसाच काळा। विद्यार्थी वेष ठरला ॥४॥

अनंतरावः—आजकालचा विद्यार्थी या सर्व गुणानी संपन्न असलाच पाहिजे. एकवेळ शाळेंत फी दिली नाहीं तरी चालेल, एखादं अभ्यासाचं पुस्तक जवळ नसल तरी चालेल, पण दुपारीं सुटींत हॉटेलांतला चहा झालाच पाहिजे, उन्हाळ्यांत आइस्क्रीमच्या प्लेटी खाल्याच पाहिजेत, तोंडांत सिगारेट असलीच पाहिजे, खिशांत तपकीरीची डबी पाहिजेच, शिवाय सेंट अत्तर यांचा घमघमाट पाहिजेच आणि पानपट्टीन हे तोंड असं रंगलंच पाहिजे, विद्या शिकायला सध्यां येवढ्या गोष्टी बस झाल्या.

सोन्याः—मग ती विद्या कसलीहि असो, गायनाची असो, वादनाची असो अभिनयाची असो की नर्तनाची असो, विद्या असली म्हणजे झालं. यशवंतराव, तुम्ही आजवर फार तर ४ इतिहास ५ भूगोल आणि ६ इंग्रजी बुकं शिकला असाल, पण त्याचा या जगांत कांहीं उपयोग का आहे ? यामुळं उलट बेकारी मात्र वाढली, अहो, आमच्या संस्थेंत, १०-५ मॅट्रिक आणि ४-५ बी.ए. कारकुनाच्या न् डोअरकीपरच्या जागेवर २५ रुपयावारी रखडताहेत, त्यांचा दर्जा आमच्या खालीच. कारण आम्ही या वयांत ललितकलेमध्यें पारंगत होऊन नट सम्राट, अभिनय पटू, गानकिन्नर, मत्त-मयूर म्हणून वावरतों आहों. पहा आमची विद्या.

माधवः—हं. हं. इथं नको अनंतराव, यांना आमच्या क्लबांत घेऊन चला ! यांच्या विद्येचा फायदा आम्हालाही होईल थोडाबहूत. चला !

अनंतरावः—अरे पण हो. इतकी घाई कां, चल आपण त्या हॉटेलांत जाऊ !

माधवः—पण थांबा. तो पहा हॉटेलवाला इकडेच येतोय, त्याचे मी पैसे देणं आहे, चला दुसरीकडं जाऊ या. अरे, इकडून हा पानपट्टीवाला आला. चला चला, नाहींतर इथ रस्त्यांत शोभा.

मुकुंदः—हो तर काय !

---

## प्रवेश दुसरा

**यशवंतः**— विद्या व दारिद्य यांची येवढी मैत्री कां हें गूढ आमच्या मास्तरांना सुद्धां सांगतां आलं नाहीं. पैसा नाहीं म्हणून मला विद्या शिकतां येणं भारी अवघड झालं आहे. शाळेंत न जातां घरीं शिकावं म्हटलं तर शिकवणार कोण ? दिवसे दिवस वाढणारा शाळेचा खर्च निभावत नाहीं व खर्च केल्याशिवाय शाळा नाहीं असा दोहीकडून मला पेंच पडला आहे. येवढीं पुस्तकं घोकून शिकून शेवटीं मी साधा कारकून होणार कीं कांहींतरी नांव कमवणार ? किती तरी मोठे लोक माझ्या सारखेच लहानपणी गरीब होते. त्यांनीं मधुकरी मागितली, वार लावले, रस्त्यांतील कंदिलाखालीं बसून अभ्यास केला असं म्हणतात. मग मलाच या गोष्टी अवघड कां वाटाव्यांत ? असो. ही आपत्ती निघून जाईल पण शिकण्याचं वय गेलं कीं ते कांहीं पुनः येणार नाहीं. [ सुंदर प्रवेश करते.

**सुंदरः**—यशवंतदादा, काल आमच्या बाबांनीं तुझी आठवण काढली. माझ्याजवळ तुझी खूप चौकशी केली. तेव्हां तूं घरीं कां चालत नाहींस ? हे बघ, बाबा आई आतां तुझ्यावर रागावणार नाहींत. काल आपल्या दादाकडं किती लोक पैसे मागायला आले. तिथं खूप भांडणं झालं, रात्रीं दादा घरींच आला नाहीं. कुठं गेला आहे निघून कोण जाणे ?

**यशवंतः**—छे, छे, सुंदर, तो इथंच आहे. नाटक रंगभूमीवर आणण्यासाठीं तो बिचारा भारी धडपडतो आहे. अभ्यास, शाळा, घरदार, सारं सोडून तो त्या कामांत पूर्णपणें गढून गेला आहे.

**सुंदरः**—भलत्या मुलांच्या नादी तो लागला म्हणून बाबा त्याच्यावर रागावले. हे बघ, त्याच्या कपाटांत किती तरी बायकांचे, बालगंधर्वांचे आणखी कुणाकुणाचे फोटो होते. ते बाबांनीं घेऊन फाडून टाकले. अत्तराच्या बाटल्या, रेशमी हातरुमाल, बटणं, घड्याळ किती तरी सुरेख सुरेख जिनसा त्याच्याजवळ होत्या. तुझ्याजवळ आहेत कां तसल्या ? असल्या तर मला देना थोड्याशा ?

यशवंतः---सुंदर, शाळेंत शिकणाऱ्या मुलांना किंवा मुलींना अभ्यास शिकायला या असल्या गोष्टीची जरूरच लागत नाहीं. तूं आतां आहेस तशीच साधी सुधी रहा. टापटीप नीटनेटकेपणा ठेव. पण लोकांच्या डोळ्यांत भरेल इतका नट्टापट्टा किंवा थाटमाट करूं नकोस. जुनं सोडूं नये. चांगल असेल ते नवं टाकूं नये. असं वागावं. [गुलाब प्रवेश करते.]

गुलाबः---इश्श, सुंदर, कसल्या घाणेरड्या मुलाशी बोलत उभी आहेस तूं ? अग रस्त्यांत बोलत उभं राहायला माणूस तसंच छानछुक पाहिजे. या कळकटलेल्या सुतकी मुलाबरोबर मी कधीं सुद्धां भाषण करायची नाहींग बाई.

सुंदरः---गुलाब हा आमचा यशवंत दादा. घाणेरडा कां आहे हा ? याच्याजवळ कोट जाकीट नाहीं, चांगली टोपी नाहीं, पायांत बूट नाहींत, म्हणून हा वाईट कां आहे ?

गुलाबः---शाळेंत शिकणाऱ्या मुलींनीं नेहमीं छानदार पोषाखाकडं लक्ष ठेवावं. तुझा दादा कसा बरं ऐटीत रुबाबांत वागतो, किती छान दिसतो, किती गोड बोलतो, किती नाजुक चालतो, मला किनई फार फार आवडतो.

पद

मन्मानसा भुलवी जिवाला टोचणी लावी ॥ धृ० ॥
चंद्रा रवीला लाजवी । इंद्रासही दिपवी ॥
तुलना नसे ती रुपकांती । गोजिरी दावी ॥ १ ॥
आली वसंती पालवी । शोभा किती यावी ॥
घ्यावी तिथे विश्रांति । देवा हौस हीं पुरवी ॥ २ ॥

सुंदरः---तसंच हा आमचा यशवंत सुद्धां मला फार आवडतो. अग गुलाब याला किती किती येतं ! हा गीता म्हणतो; आर्या म्हणतो, अभंग गातो, इंग्रजी सुद्धां सुरेख बोलतो, इतिहास भूगोल सुद्धां पाठ म्हणतो.

गुलाबः---असेल, म्हणत असेल, त्याला काय चाटायच आहे ? पण हा नजरेत भरतोय का ? याला पाहून समाधान वाटतंय का ? इश्श बाई, माणसान कसं नेहमीं चांगल दिसावं. वाईट असलं तरी कपडेलत्ते नट्टापटा रंग-

रंगोटी करून नेहमीं चांगल दिसाव. तुझे दादा आपल्या केसाला किती जपतात, कोटाची इस्त्री मोडू देत नाहींत, बुटाला घाण लागू देत नाहींत, कपड्याला डाग पडूं देत नाहीत, धोतराला सुरकती पडूं देत नाहींत, ओठावर मिशी उगवू देत नाहींत---

सुंदरः---म्हणूनच आमचे बाबा त्याला नेहमीं बोलत असतात. दादा आपला सदानूकदा फणी कंगवा पोमेड आरसा घेऊन बसलेला असतो, अभ्यास तर कधींच करीत नाहीं, पुस्तक उघडीत नाहीं---

गुलाब---पुस्तकं सुद्धां टापटीपीत असतात, नवी कोरी दिसताव, नाहीं- तर हे बघ, तू कशी वेंधळ्यासारखी हीं बुकं बांधली आहेस, तो पदर सावर, ओचा खोवून घे; ब्लाऊजची कॉलर दुमटली आहे ती नीट कर. तुझ्या दादाला तूं अगदीं शोभत नाहींस बाई ! असं अजागळ गलथन वागायच मग शाळेंत कशाला जायचं !

यशवंतः---शाळेंत विद्या शिकायला जायचं, ज्ञान मिळवून जगाच्या दृष्टीनं मोठं व्हायला जायचं. ज्ञानी लोकांच ज्ञान भांडार पाहून मनाचं समाधान करायला जायचं. हे परदेशी छचोर चोचले, फाजिल नटवेपणाची आवड किंवा असली पोशाखाचीं घेडगुजरी तऱ्हा संपादन करण्यासाठीं शाळेंत जायचं नसत. गुलाबबाई, तुमच्या या असल्या पोशाखामुळं अडाणी लोकांना कुलीन कोण व मलीन कोण यांतील मर्यादाच कळेनाशी झाली आहे.

गुलाबः---अग बाई, कोण उद्धट आहांत हो तुम्ही. तुम्हाला कांहीं बोलण्या चालण्याची रीत तरी आहे कां ! शाळेतल्या मुलीशी कसं बोलावं काय बोलाव याच कांहीं शुद्ध तुम्हाला असायला पाहिजे ! मॅनरलेस ब्रूट. मुलींच्या समोर येवढा निर्लज्जपणा, दांडगेपणा, आतां जर माधवराव असते तर तुम्हांला इथच्या इथं त्यांनीं बायकांशी वागायची पद्धत शिकवली असती, तुम्ही अगदींच पशू आहांत.

यशः---हां चूप, मुलींच्या पोषाखांत वावरतां म्हणून गय करतो, हे शब्द जर दुसऱ्या कुणी मुलानं माणसानं उच्चारले असते तर---( माधव प्र. क. )

माधवः---तर काय, तर काय, येशा, रस्त्यांत उभं राहून मुलींची

टवाळी करतोस त्यांची चेष्टा थट्टा मस्करी करतोस ? बायकांची बेइज्जत करतोस, इथल्या इथं थोबाड रंगवून टाकीन. शाळा सोडून हे थेर, शाळा सोडून हे थेर, आं–आं–आं—

गुलाबः—तुम्ही आलांत, अगदीं वेळेवर आलांत, बरं झालं. याच्या जिभेला कांहीं हाड तरी आहे का ? गावगुंड टवाळ कुठला ? मला नाहीं नाहीं तें बोलला.

माधवः—कायरे, यांना तूं कोण समजलास ? पुनः बोलून वर पहा, होता कीं नव्हता असं करतो. तुझा माज जिरवून टाकतो, तूं कसल्या घमेंडींत आहेस ?

सुंदरः—दादा, यशवंता कांहींच उणं अधिक बोलला नाहीं, गुलाबनंच त्याला नांवं ठेवली, त्याला घाणेरडा म्हटलन्, ओंगळ म्हटलन्—

माधवः—सुंदरे, तूं आलीस कां त्याचा कड घेऊन भांडायला, चल चालती हो घरीं, रस्त्यांत तमाशा दाखवू नकोस ! जातेस कीं नाहीं ? ( तिला मारतो )

यशवंतः—हां बाळासाहेब, या मुलीवर हात टाकाल तर परिणाम वाईट होईल. त्या निरपराध मुलीला अवाक्षर बोलाल तर इथं या रस्त्या-वर तुमची शोभा होईल, मुकाट्यानं चालते व्हा.

माधवः—मला दम देतोस, मला भीति दाखवतोस, थांब थांब तुला इथं लंबा करतो, सोड ग गुलाब, सोड ग गुलाब, याच्या ताकदीची घमेंड जिरवतो. आं. त्या हॉटेलवाल्याला, पानपट्टीवाल्याला चिथावून माझ्या घरीं तूंच धाड-लस नाहीं का, मला, उनाड ठरवून सारा चांगुलपणा तूं आपल्याकडं घेतोस नाहीं का ? थांब, थांब, तुझी हड्डी नरम करतो.

सुंदरः—दादा, दादा, दादा, अरे असा वर्दळीवर येऊं नकोस रे ! यशवंत, तूं रागावूं नकोस, तूं भांडूं नकोस, तुला माझ्या गळ्याची शपथ आहे, आईची बाबाची विद्येची शपथ आहे. दादा, दादा, दादा, यश-वंताला मारू नकोस, तो फार चांगला आहे रे ! तो फार चांगला आहे रे,

माधवः—चांगला आहे म्हणे चांगला ! कारटे याच्याशीं फार संबंध ठेवूं नको. हा एकादे वेळीं तुला पळवून न्यायचा !

गुलाबः—माझ्या सारख्या सुजाण मुलीची थट्टा करायला जो ज्याला नाहीं तो या भावड्या पोरीला तेव्हांच फुस लावावयाचा, चला, माधवराव चला, गॅदरिंगच्या नाटकाच्या तालमीची वेळ झाली. तुमचे ते नवे मित्र सोन्या बापू येऊन वाट पहात बसले असतील. चला.

[ पडदा पडतो. ]

---

## प्रवेश २ रा.

माधवः—अनंतराव, सोन्याबापू, बरे भेटलांत. मी दोन दिवस तुम्हाला शोधतो आहे, पाहतो आहे, पण तुमची गांठच पडेना.

अनंतरावः—माधवराव, आम्ही कामा धंद्याची माणसं. तशांत बायका पोरांचा संसार आमच्या मागं, तशांत ही शहर गांवची राहणी. आम्ही काय तुमच्या सारखे गर्भश्रीमंत आहोत मोकळं असायला ? तुम्हांला कांहीं पोटाची, कपडयालत्त्यांची, राहण्याची काळजी आहे का ?

माधवः—होय हो. आज माझ्यावर तोच प्रसंग आला आहे म्हणून तर मी तुमच्याकडं आलो आहे. तुम्ही माझे स्नेही, तुम्ही माझे हितचिंतक, तुम्ही मला मदत करणारे, तुम्ही माझ्यासाठीं झीज सोसणारे, तुम्ही माझ्या कल्याणाची काळजी वाहणारे, तुम्ही माझी अब्रू संभाळणारे—

सोन्याः—माधवराव काय आणलं आहांत तरी काय मनांत ? आज आमच्या मामांची अगदीं मनसोक्त स्तुती चालविली आहांत ! अहो तुम्हासारख्या श्रीमंतावर असे प्रसंग का येत असतात ? त्यांना कधी कशाची जरूर का लागत असते ?

माधवः—होय हो. माझ्यावर तसाच बिकट प्रसंग आला आहे. अगदीं अब्रू जाण्याची वेळ आली आहे. तुम्ही मला मदत करा. यावेळीं मदत करा. मला रोख १०० रुपये पाहिजे आहेत, मी तुमचे पैसे अगदीं निश्चितपणें परत करीन, वाटल्यास व्याज सुद्धां देईन, पण मला पैसे द्या.

मुकुंदः—( हंसून ) माधवराव, अहो माझ्यासारख्या गरिबाची थट्टा

करणें तुम्हाला शोभत नाहीं १०० रुपये १०० रुपये येवडे पैसे आम्हाला संबंध वर्षांत सुद्धां दिसत नाहींत. मग देणार कुठले ?

माधवः—सोन्याबापू, तुम्ही कांहीं खटपट करा, तुम्ही शब्द टाकाल तर कोणीहि तुम्हाला १०० रु. देतील. निदान तुमच्या पगारापैकीं शिल्लक असेल ती तुमच्या मालकाकडून घ्या. माझी वेळ भागवा, नाहीं म्हणूं नका.

सोन्याः—अहो, मीच तुमच्याकडं पैसे मागायला चालला होतो. गॅदरिंगच्या नाटकामुळं माझी नोकरी गेली. आतां तुम्हीच मला महिनाभर पोसा, आपण मग नवी नाटक कंपनी काढूं या ! तुम्ही सावकार—

माधवः—सोन्याबापू, मुकुंदराव, मी खरंच गरजू आहे हो. माझी अशी थट्टा करूं नका. तुमच्या जवळचे पैसे तुम्हाला देणं नसेल तर परवा मी तुम्हाला दिलेले ५० रु. तरी द्या. सोन्याबापू, मी दिलेल्या अंगठ्या, घड्याळ, तरी परत द्या. कुठं तरी गहाण ठेवून किंवा बाजारांत विकून पैसे करूं या.

मुकुंदः—तुम्हा श्रीमंताची पोरं अशी आमच्यावर उलटाल हें मला माहितच होतं म्हणून मी अगदीं प्रथमपासून सावध होतो. का सोन्या, पटली कीं नाहीं प्रचीती ? बाबारे जग हे असं आहे बरं, माधवराव, छान अदावत घेतलीत; अहो तुम्ही दिलेले ५० रुपये तुमच्यासाठींच खर्च केले, किरकोळ बिलं दिली. उलट कांहीं कमी पडले ते मी माझ्या पदरचे घातले. अजून सोन्याची बिदागी द्यायची राहिलीच आहे.

सोन्याः—माधवराव, तुम्ही ते पैसे मला आताचे आतां देऊन टाका. यासाठींच मी तुमच्या घरी चाललों होतो. अहो, माझ्या वेळेला जर ते पैसे मिळाले नाहींत तर मग आम्ही जी मेहनत केली त्याचं चीज काय ? चला, तुम्ही असेच घरीं चला.

माधवः—सोन्याबापू, मुकुंदराव, मला घरीं जायला तोंडच नाहीं हो, तुम्हा स्नेह्यांच्या बळावर मी घरातून रागारागानं निघून आलों आहे. बाबानी मला जा म्हणतांच त्याच पावली मी घर सोडलं आहे.

सोन्याः—आणि मग आतां कसं करायचं ? माधव, तूं हे बरं केलं नाहींत. आमचं पैसे चुकते करून मग घरांतून बाहेर पडला असतास तर—

माधवः—पण आतां काय त्याचं. तुम्ही आम्ही मिळून या संकटातून प्रथम पार पडूया, मी तुम्हाला विसरणार नाहीं.

मुकुंद—जन्म देणाऱ्या आईबापाची माया तोडून त्यांचे डोंगरायेवढे उपकार विसरून एखाद्या कृतघ्नाप्रमाणं जो बाहेर पडला तो आम्हांसारख्या चार दिवसाच्या शाळू सोबत्यांची काय पर्वा करणार ? माधव, अरे ज्यानं आईबाप सोडले, घर टाकलं, आप्तेष्ट सोडले, त्याला या तुसडया जगांत काडीची किंमत नाहीं. तूं आपली दुसरीकडे पैशाची सोय पहा.

सोन्याः—माधव, गावांतल्या लोकांची बिलं करण्याआधी या गोष्टीचा तुला विचार पाहिजे होता, मामा चला, याच्या बरोबर बोलत उभे राहिलो तर आपण सुद्धां गोत्यांत येऊं एकादे वेळ. हो उगीच पोलीस चौकीची हवा नको खायला—

मुकुंदः—माधव, ए म्हाद्या, आतां तरी शहाणा हो. ही सगळी लफडी आवरली म्हणजे मग सवडीनं माझी गांठ घे. पाहीन कुठं जमलं तर ( जातात. )

माधवः—आतां मला खास रडूं कोसळणार, घर फिरलं म्हणजे घराचे वासे देखील फिरतात हे अगदीं खरं. मला आईबापानी टाकलं. त्यानी कसलं टाकलं मीच त्यांना सोडलं, माझा आधार तुटला, त्याबरोबर माझा उपजत मोठेपणा संपला. या जगांतील माझी किंमत कवडीमोल झाली. मी उनाड गावगुंड ठरलो. स्नेह्यासोबत्यांना मुकलो. अन्नाला महाग झालो. दुःख ओकून टाकायला जिव्हाळ्याचे जोडलेले कोणीच स्नेही शिल्लक सुद्धां उरले नाहींत. आई, बाबा, तुम्हीं तरी मला पुनः आसरा द्याल कां, सुंदर तूं तरी माझ्याशीं बोलशील का ? आई, आई, आता मी काय करूं. बस माझी या जगाला पर्वा नाहीं. मग मी तरी या जगांत राहू कशाला ? घर सुटलं शाळा सुटली, स्नेही सुटले, मीही या संसार चक्रातून सुटून कायमचा नाहींसा होतो. ( यशवंत प्रवेश करतो.

यशवंतः—माधव, कुठं चाललास, मनांत काय योजलं आहेस ? अरे, असा माझ्याकडं पाहतोस काय ? मी यशवंत तुझ्या बऱ्या अन्नाला जागून जन्मभर तुमच्या ऋणांत राहणारा मी यशवंत बोलत का नाहींस ?

माधवः—यशवंत, यशवंत, यशवंत, मी तुझ्याशीं कोणत्या तोंडानें बोलूं ! कुठं जाणार, काय करणार, काय सांगू आणि माझं कोण ऐकणार !

यशः—माधव, अरे मी आहेना ! तुझं दुःख स्वतःच्या शिरावर घ्यायला मी आहेना ! पूस हे डोळे पूस, माझ्यावरला राग काढून टाक. मला सांग, तूं कुठं चालला होतास ?

माधवः—कुठं चाललो होतो ? काय सांगू ? यशवंता, कृतघ्न जगाचां तोंड पुनः दिसणार नाहीं अशा ठिकाणीं जात होतो. हा जीव कायमचा नाहींसा करण्यासाठीं जात होतो.

यशः—अरे अरे अरे, माधव, तूं आत्महत्त्या करणार ? आणि ती कां म्हणून ? आत्महत्त्या करण्याजोगं तुझ्या हातून असं काय पाप घडलं आहे ?

माधवः—मी पापी ठरलो, आईच्या, बाबांच्या, मित्रांच्या सर्वांच्या दृष्टीनं पापी ठरलो, मला मान उरला नाहीं, किंमत उरली नाहीं.

यशवंत—माधव, नाहीं नाहीं. तू पापी नाहींस. तुला किंमत आहे पण या लबाड जगाला ती कळलेली नाहीं, तू अमोलिक हिरा आहेस, पण या जगाच्या उकिरड्यावर पडला आहेस, तुझ्या आयुष्याला अजून सुरवातहि नाहीं तोच तूं असा अस्ताला जाणार ? आणि विद्यार्थी दशेतच जर मरायच तर असं भागुबाईच मरण कां म्हणून मरायचं ? नांव कमवून मरायला सध्यां विद्यार्थ्यांपुढं किती तरी मार्ग मोकळे आहेत. परिक्षेत नापास झाल्यामुळं आत्महत्त्या केल्याचीं उदाहरणं हल्लीं विद्यार्थ्यांत घडूं लागली आहेत. पण माधव हा भित्रेपणा आहे· असले विद्यार्थी जन्मालाच न येतील तर बरं.

माधवः—यशवंत, पण आतां मी विद्यार्थी नाहीं. उनाड, गावगुंड, टवाळ. परीक्षेंत कॉपी करून रस्टिकेट झालेला, असला अधम. मला मेलंच पाहिजे.

यशः—छे, छे, तुला मरायला यायचच नाहीं. अरे तुझ्या आईनं वडिलानीं शतायुषी भव असा वेळोवेळी दिलेला आशीर्वाद कधीं खोटा कां होणार आहे ! तूं आत्महत्त्या करशील तर मात्र देवाघरी अपराधी ठरशील. देवाची

आशा मोडल्याचं पातक तुला लागेल. शंभर वर्षं जगून या जगातला आपल्या कर्तव्याचा वाटा आपण उचललाच पाहिजे. चल, माझ्याबरोबर घरी चल. तुझी आई तुझे बाबा तुझ्यासाठीं नुसते तळमळताहेत. तुला शोधण्यासाठीं त्यानी सगळीकडं माणसं पाठविली आहेत. बिचारी सुंदर सुद्धां रस्तोरस्ती फिरते आहे !

माधवः—मला शोधायला बाबानी माणसं पाठविली ? आई माझ्या-साठीं झुरत बसली आहे ?

यशः—अरे, कसं झाल तरी ती तुझी आई आहे, तूं कितीही वाईट वागलास तरी तिची माया कां कमी होणार आहे ? बाबा एकवेळ निष्ठुर होतील पण तुझी आई ! नाहीं, नाहीं.

पिता जरी विटे विटो न जननी कुपुत्रीं विटे। दयामृत रसदंधीं न कुल कज्जले त्या किटे । प्रसाद पट झांकिती परि परा गुरुचे थिटे । म्हणूनि म्हणती भले न ऋण जन्मदेणेचे फिटे [ सुंदर प्र. क. ]

सुंदरः—दादा, दादा. अरे तूं कुठ गेला होतास इतके दिवस ?

पद

काऽऽऽकोपलासि आता दादा चल रे घराला ।।
चैन ना पित्याला मजला आईच्या जिवाला ऽऽ।। धृ ।।
तुझ्या विना घर ये खाया । रुसवा का धरिला वाया ।
सोडी राग आतां धरीरे, शांति मनाला ।। १ ।।

चल, चल, घरीं चल आई बाबा तुझीं वाट पाहताहेत. अरे, आई तर दोन दिवसांत जेवली सुद्धां नाहीरे. सारखी रडते आहे. आतां तुला बाबा बोलायचे नाहींत तूं घरीं चल.

यशः—माधव, अरे या निष्पाप मुलीच्या भोळ्या भाबड्या मनांत तुझ्याविषयीं काय भावना आहेत इकड लक्ष दे. मन घट्ट कर, घरीं चल. अरे, आई बापाजवळ क्षमेची दयेची याचना करायची नाहीं. तर मग कुणा-जवळ करायची ? अरे, या जगांत मूर्तिमंत दयेची देवता जर कोणी असेल

तर ती आई ! परमेश्वरासारखं मन मोठं करून निरक्षेपपणें हित चिंतणारा जर कोणी असेल तर तो बाप. त्यांच्या पाया पडायला लाज कशाला ! भीड कशाला ! चल चल. तुझ्या अपराधाबद्दल ते तुला अवाक्षर बोलणार नाहींत याचा जिम्मेदार मी आहे चल.

पद

वन्दे मातरम् । सुजलाम् । सुफलाम् ।
मलयज शीतलाम् । सस्यशामलाम् मातरम् ॥ १ ॥
शुभ्रजोत्स्ना पुलकित यामिनीम् । फुल्ल
कुसुमित द्रुमदल शोभिनीम् । सुहासिनीम्
सुमधुर भाषिणीम् । सुखदाम् वरदाम्
मातरम् । वन्दे मातरम् ॥ २ ॥

समाप्त.

सतत २५ वर्षें चालत असलेलें लोकाश्रयाखालील अत्यंत जुने दुकान
भपक्यास व खोट्या थापास भुलूं नका !
न्यू रॉयल लाँड्री
मालक—एस. बी. ॲण्ड ब्रदर्स,
सदाशिव ५४५ नागनाथाचे पाराजवळ.
सफेत कपड्यास २ पैसे, रंगीत ३ पैसे.
शेंकड्यांस २-१२-०.

पुण्यांत पहिल्या प्रतिचें उत्कृष्ट, सुबक व वक्तशीर

छपाई करून मिळण्याचें

एकच ठिकाण

REFBK-0005774

# इंदिरा प्रेस

नातूंचा बाग

६८९-१५ सदाशिव पेठ, पुणें.

# सुभाष संगीत मेळ्यांत

## भाग घेणारीं मुलें व मुली

कुमार राम पिसे
कृष्णकुमार कुलकर्णी
कुमार श्रीधर ताडफळे
कुमार मनोहर सबनीस
कुमार वासुदेव ताडफळे
कुमार वसंत गोवित्रीकर

कुमारी विमल टांकसाळे
कुमारी कमल पेंडसे
कुमारी शकुंतला उकिडवे
कुमारी कुमुद चाफेकर
कुमारी बेबी वैद्य
कुमारी विमल ठाकुर

कुमार शरद गोखले

संगीतः—राम वाशीकर, वादनः—पंडित व्यास

— कवि —

श्री. उम्राणीकर, प्रभा परांजपे, माधवराव बापट, मा. ना. जोशी, नानासाहेब गोखले, वि. ग. फाटक

मदतनीसः—गोविंद पाडळीकर, बापू गांगल.

व्यवस्थापक
पुरुषोत्तम ताडफळे

मेळ्याचे प्रवर्तक



मास्टर-राम





मेळ्याचे चालक-



मास्टर-पुरुषोत्तम

मुद्रक व प्रकाशक

ग. गो. दिवाकर इंदिरा प्रेस. ६८९|१५ सदाशिव पुणें.